# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८.

(यापुढील पत्र व्यवहारात खालील क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.)

(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्काचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

## (कमेन्समेंट सर्टिफिकेट)

## - बांधकाम चालू करणेकरिता दाखला -

सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४५ यातील तरतुदीप्रमाणे अटीवर देण्यात येत आहे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२(जुना मुंबई अधिनियम १९४९ ची कलमे (सेक्शन्स)२५३ व २५४ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटीवर देण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.
क्रमांक – बीपी/ वाकड/७५६/२०१५
दिनांक:१६/१०/२०१५

श्री./श्रीमती/मे. कॉनकॉन इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे श्री. निलेश कलोटे द्वारा ला.सर्व्हेअर समिर वाळिंबे पत्ता १० जान्हवी, ४२/२२, भोंडे कॉलनी एरंडवना, पुणे यांना.

मा. शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून-

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलमे २५३ व २५४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील वाकड येथील सर्व्हे नं. — सि.स.नं. ४६, ४६/२, व १९४, १९४/१ प्लॉट नं. — मधील बांधकाम करण्यासाठी महापालिकेला तुम्ही नोटीस दिली. ती दि. २६/०६/२०१५ या दिवशी पोहोचली. त्यावरुन काम करण्यास खाली लिहिलेल्या अटीवर व जादा अट क्र. २५ ते — नुसार तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या नवीन दुरुस्त नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.
२) संकल्पित बांधकाम रस्त्याच्या प्रमाण रेषेत येत असल्यास महानगरपालिकेचे अधिकारी सांगतील त्या वेळी सदर काम स्वखर्चाने आणि बिनतक्रार काढून टाकले पाहिजे.
३) जोत्यापर्यंत काम आल्यानंतर सेट-बॅक नगर नयोजन कार्यालयाकडून तपासून घ्यावेत. त्याशिवाय जोत्यावरील काम सुरु करु नये.
४) सोबतच्या नकाशावर मागे लिहिलेल्या/अटींवर हे संमती पत्र देण्यात येत आहे.
५) ज्या प्लॉटवर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे. त्या इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट मागण्यापूर्वी प्रत्येक मालकाने इमारती समोर कंपाऊंड वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था, खबरदारी घ्यावी त्याशिवाय कंप्लीशन सर्टिफिकेट मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरुर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे. तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.
६) इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेला इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
७) नवीन बांधकाम सुरु करताना संबंधीत जागेवर झाडे असल्यास ती ट्री ऍथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत

राहून सदर बांधकाम परवानगी देलेली आहे. सदरहू अपीलाचा निर्णय विकसक/अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील महापालिकेवर त्याची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१०) आपल्या इमारतीचे सांडपाणी नालका म.न.पा. ड्रेनेज मालकला मालकाने स्वखर्चाने जोडावयास हवी.

११) भूखंडधारकाने, प्रमोटर/ बिल्डरने अथवा प्रकल्प बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराने पूर्णत्वचा दाखला घेणेपूर्वी नियोजित निवासी/ व्यापारी गाळे धारकांच्या यापुढे येणाऱ्या कोणत्याही तक्रारीस म.न.पा. जबाबदार राहणार नाही. असे प्रतिज्ञापत्र (स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट यांचे स्वाक्षरीचे) म.न.पा. कडे सादर करावे. पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक व आरोग्य विभागाचा ना हरकत दाखला इकडे सादर करावा.

१२) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकांच्या नांवे दर्शविलेली टपालपेटी(Letter Box) सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील त्याखेरीज इमारतीचा भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१३) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार महापालिकेच्या ताब्यात घेणे बंधनकारक आहे.

१४) इमारतीच्या सलोह कॉंक्रीट (आर.सी.सी.) कामाच्या सर्व बाजूकरिता आधार व आकारासाठी लाकडाचा वापर करु नये. त्यासाठी लोखंडी आधाराचा वापर करणे बंधनकारक राहिल.

१५) इंडियन सो. ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स पुणे – ३०. या संस्थेकडील मान्यताप्राप्त दर्जाच्या स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची इमारतीच्या कामासाठी नेमनुक करण्यात यावी, तसेच सदरचे काम स्वीकारल्या बाबतचे स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांचे पत्र या विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे पत्र सादर केल्याशिवाय इमारतीच्या बांधकामास सुरुवात करु नये.

१६) भुखंडाच्या संबंधीत सहामाही अखेरचा कर भरलेचा करसंकलन विभाग म.न.पा. यांचेकडील दाखला/पावती सादर केल्याशिवाय बांधकाम चालू करु नये.

१७) मंजूर रेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे नियम क्र.११.३.१.५. नुसार तरतुदी अधिन विकसित करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला दिला जाणार नाही.

१८) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र नियमानुसार महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र म.न.पा.चे नावे लावून तसा सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा, भाग अथवा पूर्ण भोगवटा पत्रक घेणेपूर्वी या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. याबाबत म.न.पा. चे भूमी-जिंदगी विभागाचा ना हरकत दाखला सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदरहू रस्ता रुंदीने बाधित क्षेत्राचे खडिमुरुमीकरण महानगरपालिकेच्या विनिर्देशाप्रमाणे अर्जदार स्वतः खर्चाने करणार अथवा महानगरपालिकेच्या त्यावेळच्या प्रचलित दराने खडीमुरुमीकरण खर्च भरणे आवश्यक आहे.

१९) प्रस्तुत प्रकरणातील जागेची मोजणी नकाशा वहिवाटीनुसार असून जागेच्या हद्दीबाबत वाद निर्माण झालेस म.न.पा. जबाबदार राहणार नाही. नगरभुमापन कार्यालयाकडील सुधारित मोजणी नकाशा/ व मालमत्ता पत्रक सादर केल्याशिवाय बांधकामास भाग अथवा पूर्णत्वाचा दाखला देण्यात येणार नाही.

२०) प्रस्तुत प्रकरणातील भुखंडाचे एकत्रिकरण नगर भुमापन कार्यालयाकडुन घेऊन, त्याप्रमाणे सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा भोगवटापत्रक घेण्यापुर्वी या विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

२१) ३०० चौ.मी. व वरील क्षेत्राचे भुखंडावरील इमारतीसाठी (दाटवस्ती क्षेत्र वगळून) रेन वॉटर हार्वेस्टींग व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

२२) भूखंडालगतचे पोहोच रस्ता व आसपासचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होणे सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ९.१ नुसार ती उपाय योजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक/ अर्जदार यांचेवर राहील. अशाप्रकारे पावसाळी पाण्याचा नैसर्गिकरित्या निचरा होण्यास कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही. याबाबतची योग्य ती खबरदारी घेणे विकसक/ अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. याबाबत संबंधित गाळेधारक रहिवासी यांची कोणत्याही प्रकारे तक्रार/ हरकत निर्माण झाल्यास त्यांचे संपुर्णतः निराकरण करण्याची जबाबदारी विकसक/ अर्जदार यांचेवर राहील. त्याची म.न.पा.स कोणत्याही प्रकारे तोषीस लागू देणार नाही. या अटीवर सदरहू बांधकाम चालू करणेचे संमती पत्र मंजूर करण्यात येत आहे.

२३) साईटवर राहणाऱ्या सर्व बांधकाम मंजूरांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करणे विकसकांवर बंधनकारक आहे.

२४) विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीमध्ये पुरविण्यात आलेल्या पार्किंगचे क्षेत्र गाळे धारकांसाठी विना मोबदला उपलब्ध करुन देणे विकसकांवर बंधनकारक राहील.

उपअभियंता
बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम
नियंत्रण विभाग

शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.